महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
मध्यवर्ती कार्यालयः हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-४०० ०१३.

जा.क्र.मका/कआका/२०१९/०९ दि. १८.०२.२०१९

प्रति,

सहा.कल्याण आयुक्त / प्र.सहा.कल्याण आयुक्त

विभागीय कार्यालय, मुंबई / ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अकोला

विषय – मंडळाचे प्रतिसाद नसलेले केंद्र बंद / समायोजित करणेबाबत.

संदर्भ – मकाक०१/२०१९/प्र.क्र.७/कामगार-१० दि.३० जानेवारी २०१९

उपरोक्त संदर्भान्वये, मंडळाचे प्रतिसाद नसेलेले २२ केंद्र बंद / समायोजित करणेबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. केंद्र बंद / समायोजित करुन शासनास अनुपालन अहवाल सादर करावयाचा आहे.

सोबत बंद / समायोजित करावयाच्या २२ केंद्रांची यादी जोडण्यात येत आहे. केंद्रातील शिवणवर्ग व शिशुमंदिर आदी उपक्रमांचा कालावधी माहे मार्चमध्ये संपुष्टात आल्यानंतर माहे १ एप्रिलपासून सदर केंद्र करण्यात यावेत. केंद्रातील सर्व रेकॉर्ड संबंधित गट कार्यालयात जमा करण्यात यावा आणि गट कार्यालयांनी त्याची उचित नोंद घ्यावी. केंद्रातील साहित्य अन्य केंद्रात स्थलांतरीत करणेबाबत संबंधित विभागीय कार्यालयांनी मध्यवर्ती कार्यालयाकडे (भांडार शाखेकडे) कार्यालयीन कार्यपद्धतीनुसार प्रस्ताव सादर करावा. कर्मचारी नजीकच्या केंद्रात समायोजित करणेबाबत मध्यवर्ती कार्यालयास (आस्थापना शाखेकडे) अहवाल सादर करावा. साहित्य रद्दबादल करणे तसेच कर्मचारी समायोजित करणे याबाबतचे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही दि.१० मार्चपुर्वी पुर्ण करण्यात यावी.

आपणाकडून प्रस्ताव/अहवाल प्राप्त झाल्यानंतर कर्मचारी समायोजन आणि साहित्य स्थलांतरीत करणेबाबत स्वतंत्र आदेश दिले जातील.

प्र.कल्याण आयुक्त

प्रत माहितीस्तव सादर,

कक्ष अधिकारी, कामगार १०, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत,

सर्व अधिकारी, म.का.मुंबई

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

**बंद / समायोजित करावयाच्या २२ कामगार कल्याण केंद्रांची यादी**

दि.१८.०२.२०१९

विभागीय कार्यालयांनी सदर यादीत दिलेल्या निर्देशानुसार केंद्र बंद / समायोजित करण्याची कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल सादर करावी.

| अ. क्र. | विभागीय कार्यालय | गट कार्यालय | गटांतर्गत केंद्राची संख्या | बंद करावयाची केंद्रे | विभागीय कार्यालयांनी करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | नायगाव | १० | का.क.केंद्र, काळाचौकी, मुंबई | सदरचे केंद्र जवळ असलेल्या का.क.भवन, अभुदयनगर काळाचौकी येथे समायोजित करण्यात यावे. केंद्राची जागा ताब्यात ठेवुन त्या ठिकाणी का.क.भवन, अभुदयनगरच्या नियंत्रणाखाली एखादा उपक्रम सुरु ठेवावा. |
| २ | | वरळी | १० | का.क.केंद्र, मुकुंदनगर, धारावी, मुंबई | सदरचे केंद्र गोपीनाथनगर धारावी या केंद्रापासुन जवळ असल्यामुळे हे केंद्र समायोजित करण्यात यावे. केंद्राची जागा ताब्यात ठेवुन त्या ठिकाणी का.क.केंद्र, गोपीनाथनगर धारावीच्या नियंत्रणाखाली एखादा उपक्रम सुरु ठेवावा. |
| ३ | ठाणे | ठाणे | १३ | का.क.केंद्र, खुलेनाट्यगृह, चेंबुर,मुंबई | सदरची जागा महानगर पालिकेकडून विनामुल्य मिळालेली आहे. हे केंद्र जवळच असलेल्या टिळकनगर केंद्र आहे. केंद्राची जागा ताब्यात ठेवुन त्या ठिकाणी का.क.केंद्र, टिळकनगरच्या नियंत्रणाखाली एखादा उपक्रम सुरु ठेवावा. |
| ४ | | | | का.क.केंद्र, अण्णाभाऊ साठेनगर, चेंबुर,मुंबई | केंद्राची जागा ही भाड्याची असुन दरमहा भाडे रु.३०००/- आहे. या केंद्राजवळ कामगार कल्याण केंद्र, टिळकनगर आहे. त्यामुळे सदर केंद्र बंद करण्यात यावे. |
| ५ | | चिपळूण | ०८ | का.क.केंद्र, आडवली ता.मालवण | ग्रामिण भागात केंद्र असल्याने प्रतिसाद कमी आहे. केंद्र बंद करण्यात यावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | पुणे | पुणे | १२ | का.क.केंद्र, पर्वतीदर्शन, पुणे | केंद्राची जागा मंडळाच्या स्वमालकिची असुन जागा लहान आहे. सदरचे केंद्र का.क.भवन, सहकारनगर पुणे यांच्या नियंत्रणाखाली ठेवून केंद्रात एखादा उपक्रम सुरु ठेवावा. |
| ७ | | | | का.क.केंद्र, गोखलेनगर, पुणे | केंद्राची जागा मंडळाच्या स्वमालकिची असुन जागा लहान आहे. सभासद संख्या अल्प आहे. सदरचे केंद्र का.क.भवन, सहकारनगर यांच्या नियंत्रणाखाली ठेवून केंद्राच्या ठिकाणी एखादा उपक्रम सुरु ठेवावा. |
| ८ | | कोल्हापूर | ९ | का.क.केंद्र, फुलेवाडी, कोल्हापुर | कोल्हापुर येथे स्थानिक राजारामपुरी, सागर माळ, बिंदूचौक, फुलेवाडी व संभाजीनगर असे ५ केंद्र आहेत. त्यामुळे सदर केंद्राची जागा भाड्याची असुन मासिक भाडे रु.२०००/- आहे. त्यामुळे भाड्याचे केंद्र बंद करण्यात यावे. |
| ९ | | सोलापूर | १२ | का.क.केंद्र, जुळे सोलापूर, सोलापुर | सोलापुर येथे स्थानिक रविवारपेठ, दामाणीनगर, सदरबाझार, भावनाऋषीपेठ, गणपती हॉल, जुळे सोलापुर, सिध्देश्वर नगर, निराळे वस्ती व इंदिरानगर असे ९ केंद्र आहेत. सदर केंद्राची जागा भाड्याची असुन मासिक भाडे रु.४२००/- आहे. त्यामुळे भाड्याचे केंद्र बंद करण्यात यावे. |
| १० | | | | का.क.केंद्र, निराळे वस्ती, सोलापूर | सदर केंद्र खासगी मालकीचे असून मासिक भाडे रु.३००/- आहे. केंद्र आकाराने खूप लहान असून कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी देखील जागा अपुरी पडते. उपक्रम राबविता येत नाही. केंद्रास प्रतिसाद नाही. केंद्र बंद करावे. |
| ११ | | | | का.क.उपकेंद्र, इंदिरानगर | सदर केंद्राजवळील परिसर अस्वच्छ असून आरोग्यासाठी चांगला नाही. जागा महापालिकेची असून मासिक भाडे रु.६००/- आहे. केंद्र आकाराने खूप लहान असून कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी देखील जागा अपुरी पडते. केंद्रास प्रतिसाद नाही. केंद्र बंद करावे. |
| १२ | | | | करमाळा, सोलापूर | करमाळा केंद्राच्या जवळच कुर्डुवाडी हे केंद्र असल्याने या केंद्रास प्रतिसाद नाही. त्यामुळे केंद्र बंद करावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | नाशिक | नाशिक | ११ | का.क.केंद्र, बुधवारपेठ, नाशिक | नाशिक येथे स्थानिक सातपुर, सिडको, बुधवारपेठ, नेहरुनगर, देवळाली गाव व एकलहरे, बुधवारपेठ असे सात केंद्र आहेत. बुधवारपेठ केंद्राची जागा भाड्याची असुन मासिक भाडे रु.४५००/- आहे. सदर केंद्रास बंद करण्यात यावे. |
| १४ | नागपूर | नागपूर १ | १४ | का.क.केंद्र, ओमनगर | नागपुर येथे स्थानिक राजेरघुजीनगर, चंदननगर, इंदोरा, ओमनगर, विनोबाग्राम, वसंतनगर , बेझनबाग, म्हाळगीनगर, जयताळा व बुटीबोरी असे १० केंद्र आहेत. सदरची जागा भाड्याची असुन मासिक भाडे रु.२०००/- आहे. सदर केंद्र बंद करण्यात यावे. |
| १५ | | चंद्रपूर | ०९ | महाकाली वार्ड, चंद्रपूर | सदर केंद्राची इमारत जीर्ण झाली असल्याने बंद करण्यात यावे. मूल रोड चंद्रपूर केंद्रात उपक्रमांचे समायोजन करावे. |
| १६ | अकोला | अकोला | २१ | का.क.केंद्र, अकोटफैल, अकोला | सदरची जागा भाड्याची असुन मासिक भाडे रु.२५००/- आहे. केंद्रास अल्प प्रतिसाद असल्याने बंद करण्यात यावे. |
| १७ | | | | का.क.केंद्र, सुटाळपुरा, खामगाव | खामगाव सुटाळपूर व सतिफैल असे दोन केंद्र आहेत. सुटाळपूर केंद्राची जागा नगर परिषद खामगावची असुन नि:शुल्क भाड्याने आहे. भाड्याचे असलेले सुटाळपुरा केंद्र बंद करावे. |
| १८ | औरंगाबाद | औरंगाबाद | १५ | का.क.केंद्र, वाळुज, औरंगाबाद | औरंगाबाद येथे स्थानिक उस्मानपुरा, सिडको, कोतवालपुरा, बजानगर, शहाबाजार, भावसिंगपुरा, वाळुज, देशपांडे हॉल, छावणी, शिवाजीनगर व मुकुंदवाडी असे एकूण ११ केंद्र आहेत. सदर केंद्राची जागा ग्राम पंचायत वाळुज यांची असुन नि:शुल्क भाड्याने दिली आहे. वाळुज येथे मंडळाचे भवन असल्याने सदर केंद्र बंद करण्यात यावे. |
| १९ | | | | का.क.केंद्र, वैजापूर, जि.औरंगाबाद | नगर परिषदेकडून मासिक रु.२००/- भाड्यात जागा मिळाली आहे. केंद्रास प्रतिसाद नाही. केंद्र बंद करण्यात यावे. |
| २० | | | | उपकेंद्र जंगमवाडी, ता.जि.नांदेड | श्री.आनंद जाधव यांच्या घरात सदर उपकेंद्र चालते. मासिक भाडे रु.४५००/- आहे. उपकेंद्राच्या जवळच ललित कला भवन आहे. त्यामुळे सदर उपकेंद्र बंद करावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१ | | | | का.क.केंद्र, भोकर, जि.नांदेड | केंद्राची जागा खासगी मालकीची असून मासिक भाडे रु.४५००/- आहे. केंद्रास प्रतिसाद नसल्याने केंद्र बंद करावे. |
| २२ | | लातूर | ८ | का.क.केंद्र, परळी शहर | सदरची जागा भाड्याची असुन मासिक भाडे रु.३५००/- आहे. परळी शहर केंद्र बंद करुन केंद्रातील उपक्रमांचे परळी थर्मल या केंद्रात समायोजन करावे. |